5023/08

**स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील शाळा**
**परवानगी आदेश**

जा.क्र/शिउसं/स्वयंअ/एमसीएन/माधि-१/२०१८-१९/
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
दिनांक :- 12 APR 2019

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
**अंजना प्रतिष्ठाण, शिवाजी नगर, पुणे**

विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३चा ०१)
२) शासन निर्णय क्रमांक : एसएफएस-१०१९/प्र.क्र.१६८/एसएम-२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई ३२, दिनांक २६.२. २०१९.

उपरोकत विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ अंतर्गत सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये **नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी** प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये संस्थेस संदर्भ क्र. ०२ च्या शासन निर्णयानुसार **नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी** सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नांव ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | शाळेचे प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| औरंगाबाद | अंजना प्रतिष्ठाण, शिवाजी नगर, पुणे | अंजना स्कुल ऑफ एक्सलन्स, मौजे तळेसमन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) | इंग्रजी माध्यम |

**अटी व शर्ती**

१) सदर संस्थेने रु ३०,०००/- चे नविन चलन, रु. ५ लाखाची ३ वर्ष मुदतीची मुदतठेव व अद्ययावत बँक बॅलन्स प्रमाणपत्र (किमान १ लाख शिल्लक असलेले) विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्याकडे ३ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबीची पुर्तता न केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची / तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) सदर शाळेस संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात येत आहे. त्यानुसार संस्थेकडे शाळा स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम,२०१२ मधील तरतुदीनुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करुन संदर्भ क्र.०२ च्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

४) संबंधित सक्षम अधिका-यांनी महाराष्ट्र स्वसंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम,२०१२ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

पान दोन...

६) वरील विवरण पत्रातील परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना :-

i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे व कार्यपध्दतीचे तसेच.

ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदीचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

७) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी अधिनियम,२००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्या बाबतची पुढील कार्यवाही करावी.

८) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

९) **यु-डायस डाटा** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District information System for Education) मध्ये माहिती भरतांना **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणुन घोषित करण्यात आले आहे. त्याच प्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधिताच्या माहितीकरीता **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा,** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

१०) दर्जावाढ मंजूर झालेल्या शाळामध्ये भौतीक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. प्राथमिक शाळांच्या संदर्भात RTE act-२००९ मध्ये नमुद केलेल्या सर्व मानकांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

तसेच संदर्भ शासन आदेश क्र.३ नुसार अधिनियमाखाली शासन परवानगी दिलेल्या संस्थांच्या बाबतीत खालील बाबी शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) स्तरावर खातरजमा करण्यात यावी.

(१) शाळेने प्रस्तावित केलेली जागा/जमीन नियमानुसार किमान १ एकर सलग/अथवा शाळेसाठी योग्य असल्याची संबंधित शिक्षणाधिकारी यांनी खात्री करावी. सदर जागा/जमीन नियमानुसार आढळून न आल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

(२) दाननिधी (कायम मुदतठेव) पावतो संस्थेच्या नावावर, शाळा मान्यतेचा प्रस्ताव दाखल केल्याच्या दिनाकापासून पुढील ३ वर्षाकरिता असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर त्याचे नूतनीकरण करण्याबाबत संबंधित, संस्थची / शाळा व्यवस्थापनाची शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांचेकडे तारण म्हणून ठेवावी. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी संस्थांतर्गत शाळांना या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.

(वैजनाथ खांडके)
शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

**प्रतिलिपी : माहितीस्तव सविनय सादर**

१) मा. रा.वि.कुडले, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई.

२) मा.शिक्षण संचालक,( प्राथमिक)/(माध्य. व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१.

३) संबंधित संस्था अध्यक्ष/सचिव/ मुख्याध्यापक. यांना माहितीसाठी.

४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)जिल्हा परिषद,**औरंगाबाद** यांना देवून कळविण्यात येते की,संस्थेने प्रस्ताव सादर करतांना दाखल केलेल्या कागदपत्राची खातरजमा करावी तसेच शासन निर्णय क्रमांक : एसएफएस-२०१९/ प्र.क्र.१६८/ एसएम-२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई ३२, दिनांक २६.२.२०१९ तसेच आपल्या जिल्हयाच्या छाननी समितीच्या सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिकरित्या कळविण्यात यावे व त्याची प्रत मा. संचालनालयास व या कार्यालयास सादर करावी. विहित मुदतीत व नमुन्यात सदर शाळेचा ३.१ खाते मान्यतेचा प्रस्ताव (माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा) तपासणी अहवालासह या कार्यालयास सादर करावा. तसेच प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेची ३.१ ची मान्यता शि.अ.(प्रा) यांनी द्यावी.

५) एक प्रत उच्च माध्यमिक विभाग प्रस्तूत कार्यालय यांना माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव.